# श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय यवतमाळ

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष विशेष शिबीराचा उद्‌घाटन समारंभ

## २०२१-२२

यवतमाळ जिल्हा विकास समिती यवतमाळ द्वारा संचालीत श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय यवतमाळ येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबीराचे आयोजन दि. २२ ते २८ **फ़ेब्रुवारी** २०२२ या दरम्यान विठ्ठल रूकमीणी सभागृह दत्तक ग्राम दिघी ता. बाभुळगांव जि. यवतमाळ येथे करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वागीन कलागुणांना चालना मिळावी, विद्यार्थ्यांच्या व्यक्तितवाचा विकास तसेच ग्रामीन शिबीराच्या माध्यमातून समाज प्रबोधन व ग्रामीण विकास हा या शिबीराचा मुख्य उद्देश असतो. त्याकरीता शिबीर कालावधीत उद्योजकता काळाची गरज, माहामारीत आरोग्य विषयक घ्यावयाची काळजी,मधमाशी पालन , नवउद्योजक व शासकीय योजना ,युवा व उद्योग, महिला व उद्योजक संधी ग्राम स्वच्छता,उद्योजकता, आरोग्य, व्यक्तीमत्व विकास, स्वयंरोजगार मार्गदर्शन, शालेय साहित्य वाटप, पर्यावरण जागृती, वृक्षारोपण, व्यसन मुक्ती इत्यादी विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच ग्राम स्वच्छता, वृक्षरोपन, शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शालेय वस्तुंचे वाटप, सांस्कृतीक कार्यक्रम, भजन, जनजागरण रॅली, पथनाटय इ. माध्यमातून समाज प्रबोधन इत्यादी उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या विशेष शिबीराचा उद्‌घाटन समारंभ मंगळवार दि. २२ **फ़ेब्रुवारी** २०२२ रोजी मा.नंदकिशोर पंत, वरिष्ठ पोलिस निरिक्षक,यवतमाळ यांनी केला व शिबिराध्यांना देशहितासाठी कार्ये करावे असा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा . जगदीशजी वाधवाणी, (माजी उपनगराध्यक्ष, यवतमाळ नगर परिषद), प्रमुख अतिथी मा.प्रा.रत्नदिप गंगाळे, जिल्हा समन्वयक, रासेयो, यवतमाळ, प्रा.डॉ.संजय राचलवार, रासेयो क्षेत्रिय समन्वयक, उमेश बुटले मुख्याध्यापक दिघी शाळा ,मा.सौ.विद्याताई पाचपुते, (सरपंचा, दिघी) , अविनाश पाचपुते यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी प्रथम स्वत:ला ओळखुन आपल्या क्षमतेनुसार आपले करीअर घडविण्यासाठी प्रयत्न करावे, करीअर साठी केवळ एकाच गोष्टीवर अवलंबुन न राहता दुसऱ्या किंवा पर्यायी उपाय करून ठेवावा, शारीरिक किंवा बाह्य विकासा सोबतच बौध्दिक व अंतर्गत विकासावरही भर देणे तेवढेच महत्वाचे आहे. अभ्याासा सोबत जिद्द व चिकाटी कायम ठेवणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे मत व्यक्त करून उपस्थित मान्यवरांनी शिबीर व शिबीरार्थींना शुभेच्छा दिल्या.

डॉ. जयंत म. चतुर (प्राचार्य, श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय यवतमाळ) प्रा..डॉ.रश्मी प्र.गजरे, कार्यक्रम अधिकारी (कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो. श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय यवतमाळ) प्रा. दिगांबर वानखेडे सहकार्यक्रम अधिकारी, प्रा. जयदेव वानखेडे, प्रा. डॉ. कल्पना गोडघाटे, प्रा.डॉ. सिद्धार्थ जाधव, प्रा. वंदना इंगोले, प्रा. नितु शेंडे, प्रा. डॉ. विशाखा डेरे, प्रा. निलेश औतकर, प्रा. डॉ. निखिलेश नलोडे, प्रा. डॉ. राजाभाऊ बाजड, प्रा.डॉ. सुरेखा मंत्री महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी व सन्माननीय गावकरी पंकज रूनवाल, श्री, स्वप्नीन चौधरी,श्री. स्वप्नील ठाकरे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम अधिकारी प्रा..डॉ..रश्मी प्र.गजरे,यांनी कार्यक्रमाचे प्रास्तावीक तर प्रा. कल्पना गोडघाटे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले व प्रा. दिगांबर वानखेडे यांनी आभार मानले.

प्रा. डॉ. रश्मी प्रविण गजरे — प्राचार्य डॉ. जयंत म. चतुर,

राट्रीय सेवा योजना — श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय



लोकमत
epaper.lokmat.com
सोमवार, दि. २८ फेब्रुवारी २०२२
3



# देशहितासाठी युवकांनी कार्य करावे



दिघी येथे रासेयो शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना यवतमाळचे ठाणेदार नंदकिशोर पंत व उपस्थित मान्यवर.

लोकमत न्यूज नेटवर्क

यवतमाळ : येथील नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर २२ ते २८ फेब्रुवारीपर्यंत दत्तक ग्राम दिघी (ता. बाभूळगाव) येथे विठ्ठल-रुक्मिणी मंदिर सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन मंगळवारी पोलीस निरीक्षक नंदकिशोर पंत यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष तथा नगरपरिषदेचे माजी उपाध्यक्ष जगदीश वाधवाणी होते.

प्रमुख पाहुणे म्हणून रासेयो जिल्हा समन्वयक रत्नदीप गंगाळे, क्षेत्रीय समन्वयक प्रा. डॉ. संजय राचलवार, मुख्याध्यापक उमेश बुटले, सरपंच विद्याताई पाचपुते, अविनाश पाचपुते आदी उपस्थित होते. या शिबिरात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, ग्राम समृद्धी, कला, संस्कृती आदी बाबींवर प्रबोधन व मार्गदर्शन केले जाणार आहे.

उद्घाटनप्रसंगी नंदकिशोर पंत यांनी मार्गदर्शन केले. देशहितासाठी युवकांनी कार्य करावे, असे ते म्हणाले. अभ्यासासोबत जिद्द व चिकाटी कायम ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. रश्मी गद्दे, संचालन प्रा. कल्पना गोडघाटे, आभार प्रा. दिगांबर कानखेडे यांनी मानले.

यावेळी प्राचार्य डॉ. जयंत चतुर, प्रा. जयदेव वानखेडे, प्रा. डॉ. सिद्धार्थ जाधव, प्रा. वंदना इंगोले, प्रा. नीतू शेंडे, प्रा. डॉ. विशाखा डेरे, प्रा. नीलेश औतकर, प्रा. डॉ. निखिलेश नलोडे, प्रा. डॉ. राजाभाऊ बाजड, प्रा. डॉ. सुरेखा मंत्री, पंकज ऋणवाल, स्वप्निल चौधरी, स्वप्निल ठाकरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाला शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.